महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २१, १९४७ (शके)

(१)	वैद्यकीय शिक्षण मंत्री	यांचे प्रभारी विभाग
(२)	पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री	
(३)	मृद व जलसंधारण मंत्री	
(४)	उद्योग, मराठी भाषा मंत्री	
(५)	महिला व बालविकास मंत्री	
(६)	ग्रामविकास व पंचायत राज मंत्री	
(७)	कामगार मंत्री	
(८)	सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री	

प्रश्नांची एकूण संख्या - ३४

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

(१) * १५६६८ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) दहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासंदर्भात निर्गमित केलेल्या शासन निर्णयात तांत्रिक उणिवा असल्याचे कारण देत तो लागू करण्यात आला

नसल्याने सुमारे १४ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांची समायोजन प्रक्रिया प्रलंबित असून त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला असल्यामुळे आरोग्य व्यवस्था विस्कळीत होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या अभियानांतर्गत काम करण्याऱ्या ५० हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना माहे ऑगस्ट, २०२५ पासून वेतन देण्यात आले नसून मानधनात वाढ करण्यात आली परंतु त्यासाठी परफॉर्मन्स रिपोर्टची जाचक अट टाकली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानासंदर्भात ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी परिचारिका, एएनएम आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या समकक्ष पदावर समावेश करुन त्यांना नियमित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निदेश ग्रामविकास मंत्री यांनी सार्व.आरोग्य मंत्री यांचे समवेत झालेल्या बैठकीत दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कार्यरत चंद्रपूर जिल्ह्यातील कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट, २०२५ पासूनचे मानधन थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कंत्राटी आरोग्य अधिकाऱ्यांना प्रति महा रु.२५०००/- इतके मुळ मानधन तर रु.१५०००/- रुपये मोबदला ६-७ महिने विलंबाने मिळत असून त्यासाठी आर्थिक स्वरुपाची (लाच) मागणी केली जात असल्याचे देखील निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत तसेच थकीत मानधन मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १० वर्षे सलग सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी दिनांक १४ मार्च,२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यात दिनांक ०४ नोव्हेंबर,२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलद प्रक्रिया पार पाडण्यासाठी सुधारणा करण्यात आली असून तातडीने समायोजनासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे आरोग्य व्यवस्था विस्कळीत होणार आहे, ही बाब खरी नाही.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अभियानांतर्गत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या मानधनाची अदायगी ही SNA SPARSH च्या माध्मातून करण्याबाबत सूचना आहेत. त्यानुसार माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२५ चे कर्मचाऱ्यांचे मानधनासाठी केंद्र शासनाकडून माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निधीचा दुसरा हफ्ता प्राप्त झाल्यानंतर दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी मानधनाकरीता जिल्हयास निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर माहे ऑक्टोबर, २०२५ च्या मानधनाकरीता दिनांक १४ नोव्हेंबर,२०२५ रोजी जिल्हयास निधी वितरीत करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत राबविण्यात येणारे कार्यक्रम हे Mission मोड वर राबविले जात असल्याने कंत्राटी कर्मचारी यांचे दरवर्षी करार कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुनर्नियुक्ती देताना कामाचे मूल्यांकन करणे अभिप्रेत आहे. त्याचआधारे कंत्राटी कर्मचारी यांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुन १५ टक्के (५ टक्के सरसकट व १० टक्के कार्यक्रमांचे निर्देशांक मूल्यांकन अहवालावर आधारित) मानधनवाढ करण्यात आलेली आहे.

(३) आरोग्य सेवक (पुरुष), औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक या संवर्गात रिक्त पदांवर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समावेशनाकरीता जागा राखीव ठेवण्याबाबत सदर बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

(४) चंद्रपूर जिल्हयातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून त्यापैकी ०६ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२५ या दोन महिन्यांचे मानधन तांत्रिक कारणास्तव प्रलंबित आहे. सदर प्रलंबित मानधन अदा करण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे

(५) कंत्राटी समुदाय आरोग्य अधिकारी यांचे माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंतच्या मानधनाकरीता वित्तीय मर्यादा दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी वितरीत करण्यात आली असून माहे जून, २०२५ पर्यंतचा कामावर आधारित मोबदला अदा करण्यात आला आहे. समुदाय आरोग्य अधिकारी यांचा शिल्लक असलेला कामावर आधारित मोबदला केंद्र शासनाकडून पुढील निधी प्राप्त होताच त्वरीत अदा करण्यात येईल. आर्थिक स्वरुपाची (लाच) मागणी यासंदर्भात कोणतेही निवेदन वा तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

तुळजापूरसह (जि.धाराशिव) राज्यातील इतर जिल्ह्यांत "उमेद मॉल" उभारण्याबाबत

(२) * १८०६२ श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत "उमेद'' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियांतर्गत "उमेद मॉल" (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यांमध्ये "उमेद मॉल" उभारण्यात येणार असून त्यानंतर ही योजना राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये टप्प्या-टप्प्याने विस्तारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनामार्फत या योजनेसाठी एकूण रुपये २०० कोटी इतक्या रकमेचा निधी मंजूर करण्यात आला आहे, सदर "उमेद मॉल" उभारणीसाठी जिल्हा निवड प्रक्रियेचे कोणते निकष वापरण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, तुळजापूर (जि.धाराशिव) येथे "उमेद मॉल" बांधकाम करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली असून जिल्हा परिषद, धाराशिव यांनी तुळजापूर येथे उमेद मॉल बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला असून सदरहू प्रस्ताव अद्याप मंजूर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तुळजापूर (जि.धाराशिव) सह राज्यात "उमेद मॉल" उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ अन्वये उमेद मॉल बांधण्याकरीता प्रति जिल्हा कमाल रु.२० कोटी इतका खर्च अनुज्ञेय राहील, असा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रथमत: १० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारण्याकरीता जिल्ह्यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर (ता. जि. पालघर) येथील जे. पी. उद्योग नगर परिसरातील निंबानी सॉल्ट इंडस्ट्रीजमध्ये झालेला स्फोट

(३) * १९६५० श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (ता. जि. पालघर) येथील जे. पी. उद्योग नगर परिसरातील निंबानी सॉल्ट इंडस्ट्री या कंपनीमध्ये ॲसिड आणि मेटल पदार्थांची रासायनिक प्रक्रिया सुरू असताना स्फोट झाल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्फोटामध्ये ३२ वर्षीय श्री.दीपक आंधेर याचा मृत्यू झाला असून, श्री.दिनेश गडग, श्री.सुरेश कोंब, श्री.लक्ष्मण मंडळ आणि श्री.संतोष तरे हे जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना कंपनीमार्फत आर्थिक मदत देण्यासह भविष्यात अशा आगीच्या घटना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर स्फोटामध्ये श्री. दीपक आंधेर या कामगाराचा हॉस्पीटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तसेच श्री. दिनेश गडग, श्री. सुरेश कोंब, श्री. लक्ष्मण मंडळ आणि श्री. संतोष तरे हे चार कामगार जखमी झालेले होते. औषधोपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

(३) मयत कामगाराच्या वारसास अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांना कळविण्यात आलेले आहे.

तसेच मयत कामगाराच्या वारसास नुकसान भरपाई मिळण्याबाबत कारखाना व्यवस्थापनाने विमा कंपनीकडे दावा दाखल केलेला आहे.

सर्व जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आलेला आहे. कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत आढळून आलेल्या भंगाकरीता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालघर यांच्या न्यायालयात कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध फौजदारी दाखल करण्यात आलेला आहे.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कारखाना व्यवस्थापनास सुरक्षिततेबाबत प्रतिबंधात्मक उपाय योजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची बदली प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

(४) * १६५९२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव),

श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची दरवर्षी राबविण्यात येणारी संगणकीय बदली प्रक्रिया मागील ३ वर्षांपासून प्रलंबित असल्याने सुमारे १२ हजार शिक्षक बदलीच्या प्रतक्षित असल्याची बाब दिनांक २४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बदली प्रक्रिया तातडीने सुरू करण्यासाठी अनेक शिक्षक संघटनांनी ग्रामविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने बदली प्रक्रिया तातडीने सुरू करून बदलीच्या प्रतक्षित असलेल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१), (२) व (३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १८ जून, २०२४ अन्वये जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीचे सुधारित धोरण विहीत केले आहे. या सुधारित धोरणानुसार जिल्हांतर्गत बदली सन-२०२५ करीता बदलीचे वेळापत्रक दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये निश्चित केले आहे.

सदर विहित वेळापत्रकानुसार सन-२०२५ करीता सर्व जिल्हा परिषदांकरीता जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया संगणकीय प्रणालीद्वारे पूर्ण केली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांनी बदली झालेल्या शिक्षकांच्या बदलीबाबतची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात द्वितीय स्तरावरील कर्करोग केंद्र उभारणेबाबत

(५) * २०३९६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण), श्री.विलास भुमरे (पैठण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नाशिक, अमरावती, पुणे, मुंबई, नागपूर, कोल्हापूर, नांदेड, चंद्रपूर आणि छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी द्वितीय स्तरावरील (एल-२) कर्करोग केंद्र म्हणून नऊ केंद्रांना शासनाने मान्यता दिली असून सदर केंद्र उभारण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर केंद्रात कर्करोगग्रस्त रुग्णांना दर्जेदार, सुलभ आणि संपूर्ण आरोग्यसेवा व उपचार उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने महाराष्ट्र कर्करोग सेवा, संशोधन व शिक्षण प्रतिष्ठान (महाकेअर प्रतिष्ठान) स्थापन केले असून मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रतिष्ठान कार्यरत राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, या केंद्राच्या आराखडयासाठी शासनाने एकूण रु. १६९६ कोटी इतका खर्च मंजूर केला असून नाशिक आणि अमरावती केंद्रांचा सुमारे १२६३ कोटी रुपये खर्च सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येणार असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कर्करोग केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) व (२) हे खरे आहे.

(३) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाकेअर ही सेक्शन ८ कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकल्पातील ९ L२ संस्थांच्या अनावर्ती खर्चासाठी रु.९४०.७२ कोटी तसेच आवर्ती खर्चासाठी रु.३२२.९६ कोटी अशा एकूण अंदाजित रू. १२६३.६८ कोटी इतक्या खर्चास मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच नाशिक व अमरावती या केंद्रांसाठीचा खर्च शासन निर्णय दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ अन्वये नमूद केल्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मस्क्युलर डिस्ट्रॉफी व स्पायनल मस्क्युलर अॅट्रॉफी (एसएमए) या दुर्मिळ आजाराबाबत

(६) * १६०३८ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ४५ हजार बालक दुर्मिळ अशा 'मस्क्युलर डिस्ट्रॉफी' या आजाराने त्रस्त असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजाराच्या उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे अत्यंत महाग असणे, जनुकीय तपासणीची सुविधा उपलब्ध नसणे तसेच फिजिओथेरपी केंद्रांची कमतरता असल्याने रुग्णांना उपचारांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव येथील कु.देवांश भावसार हा २२ महिन्यांचा बालक स्पायनल मस्क्युलर अॅट्रॉफी (एसएमए) या मज्जातंतूशी संबंधित आजाराने ग्रस्त असून त्यावरील खर्च रु.१८ कोटी इतका येणार असल्याने त्याच्या पालकांनी खर्च कशापध्दतीने भागवावा यासाठी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा आजाराच्या उपचाराच्या खर्चासंबंधात केंद्र आणि राज्य स्तरावर समन्वय समिती स्थापन करुन राज्यातील एकूण रुग्णांचा डेटा तयार करावा व यासाठी धोरणात्मक चौकट करावी असे आदेश मा.न्यायालयाने राज्य शासनासह केंद्र शासनास दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी व न्यायालयीन आदेश याच्या अनुषंगाने उक्त दोन्ही आजारांवरील उपचार व आजार झालेल्या रुग्णांच्या पालकांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये फिजिओथेरपी उपचार उपलब्ध आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) केंद्र शासनाने दुर्मिळ आजारावरील धोरण दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी जाहीर केले आहे.सदर धोरणानुसार दुर्मिळ आजाराबाबत विविध स्तरावर प्रतिबंधात्मक उपाययोजना, प्रकर्ष केंद्र व निदान केंद्र यांची स्थापना, दुर्मिळ आजारावरील उपचारासाठी शासकीय सहाय्य, मनुष्यबळ विकास, दुर्मिळ आजारांवरील उपचार, संशोधन व विकास यासाठी राष्ट्रीय संस्थांचा संघ निर्माण करणे औषधे योग्य दरात मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे इत्यादी बाबी संदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण भागात स्क्रब टायफस या वाढत्या आजारावर करावयाची उपाययोजना

(७) * १८०८२ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण भागात स्क्रब टायफस या जीवघेण्या आजाराचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ पासून निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजाराचे जिल्हयात २४ रुग्ण आढळले असून दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून सदरील आजारावर नियंत्रण मिळविण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०२५ अखेर यवतमाळ जिल्हयात स्क्रब टायफसचे एकूण २६ रुग्ण आढळले असून दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी एक रुग्ण सहव्याधीग्रस्त होता. त्यास हृदयरोग, उच्च रक्तदाब व मधुमेह हे आजार होते.

(३) शासनाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

• उद्रेकग्रस्त ठिकाणी मॅलेथीऑन डस्टींग करण्यात आली.

• तापाच्या रुग्णांना डोक्सीसायक्लीन वयोगटानुसार देण्यात आले.

• कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात आले व प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली.

• जलद ताप सर्व्हेक्षण, कीटकशास्त्रीय सर्व्हेक्षण, संशयित ताप रुग्णांचे रक्तजल नमुने घेण्यात येऊन तपासणी करण्यात आलेली आहे. तसेच, सर्व आरोग्य संस्थामध्ये जनजागृती करण्यात आली.

• राज्यस्तरावरील शीघ्र प्रतिसाद पथकाने यवतमाळ तसेच, स्क्रब टायफस या आजाराच्या साथरोग उद्रेक झालेल्या जिल्ह्यांना भेट दिली व प्रतिबंधात्मक उपाययोजना व नियंत्रण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

• राज्यस्तरावरून प्रतिबंध, उपाययोजना व नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी या विषयीच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ग्रामीण आणि दुर्गम भागातील बंद असलेली आरोग्य उपकेंद्रे कार्यान्वित करणेबाबत

(८) * १७५६० श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ग्रामीण आणि दुर्गम भागातील खालींग, डोहोळे, वडवली, तळवली, आमने ही पाच उपकेंद्रे बंद पडली असल्याने नागरिकांना उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाच उपकेंद्रे ही ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा घरपोच पोहोचविण्यासाठी स्थापन केली असतानाही तेथे पुरेसे कर्मचारी आणि इतर सोयी सुविधा नसल्याने सतत बंद राहत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असतानाही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद असलेल्या उक्त उपकेंद्रांत पुरेसे कर्मचारी व आरोग्य विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करुन ती कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) व (२) हे खरे नाही.

मौजे पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच त्याअंतर्गत असलेली खालींग, डोहोळ, वडवली, तळवली व आमने ही उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. सदर उपकेंद्रांमध्ये पुरेसे कर्मचारी उपलब्ध असून त्यांच्यामार्फत नागरिकांना आरोग्यविषयक सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी नियोजित शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारले जात असल्याबाबत

(९) * २०३५९ श्री.अमोल खताळ (संगमनेर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षाही जास्त शुल्क आकारत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर काही महाविद्यालयांची चौकशी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने माहे जुलै, २०२५ मध्ये एक समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेची राज्य कोट्याची तिसरी फेरी सुरू होत असताना पहिल्यादोन फेऱ्यांदरम्यान विविध खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी असलेल्या व्यवस्थापन (संस्थात्मक) कोट्यातील जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवस्थापन कोट्यासाठी नियामक प्राधिकरणाने ठरविलेल्या शुल्काच्या तीन पटीपर्यंत शुल्क आकारणी वैध ठरवली असताना प्रत्यक्षात महाविद्यालयांकडून अधिक शुल्क आकारले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कायद्यानुसार शुल्क नियामक प्राधिकरण ('एफआरए') ने आखून दिलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क आकारले जात असल्याप्रकरणी कलम तीस अंतर्गत संबंधितांवर कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) हे खरे नाही.
(२) एमबीबीएस व बीडीएस अभ्यासक्रमाच्या पहिल्या दोन फेऱ्यांदरम्यान खाजगी महाविद्यालयातील संस्थात्मक कोट्यातील रिक्त जागांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

प्रवेश फेरी	एमबीबीएस	बीडीएस
फेरी-१	४८७	३५८
फेरी-२	४१७	२६३
फेरी-३	३१४	१५०

(३) शुल्क नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजीच्या बैठकीत अतिरिक्त शुल्काबाबत प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीत वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन कोट्यांतर्गत आकारले जाणारे शुल्क सुधारित करुन पदवी अभ्यासक्रमाचे ३ पट व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ४ पट शुल्क आकारण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही.

शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात आलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क आकारल्याबाबतच्या तक्रारी पुराव्यांसह सिध्द झाल्यास महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार कारवाई करण्यात येते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत

(१०) * १७३५८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्रीमती सई डहाके (कारंजा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने केलेल्या ५ व्या कुटुंब सर्वेक्षणात राज्यात बालविवाहांचे प्रमाण २६ टक्के असून देशात महाराष्ट्र ९ व्या क्रमांकावर असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे, पालघर व नाशिक जिल्ह्यात आदिम कातकरी समाजातील अल्पवयीन मुलींची लग्नाच्या नावाखाली विक्री होत असून रायगड जिल्हयात गेल्या ९ महिन्यांत बालविवाह प्रतिबधंक कायद्याअंतर्गत २१ गुन्हयांची नोंद झाली असून गेल्या दिड वर्षात जिल्हयात ३४८ अल्पवयीन मुली माता झाल्या असून धाराशिव जिल्हयात ७३ अल्पवयीन मुलींची प्रसूती झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालविवाहाची प्रथा समूळ नष्ट करण्याच्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा. महिला व बालविकास मंत्री यांचे अध्यक्षतेखाली युनिसेफचे मुख्य कार्यकारी अधिकारी, बालसंरक्षण तज्ज्ञ अल्पा वोरा, न्युट्रिशियन तज्ज्ञ यांचेसह संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन त्यामध्ये पुढील रुपरेषा ठरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, आदिवासी भागांत जनजागृतीसाठी व महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करुन अल्पवयीन मुलींची लग्नाच्या नावाखाली विक्री होत असल्याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच, अशा अमानवी घटनांची पुनरावृत्ती होऊ नये तसेच बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) व (२) अंशत: खरे आहे,
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) निदर्शनास आलेल्या २ प्रकरणांमध्ये संबंधित दोषींविरुध्द कायदेशीर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(६) राज्यामध्ये बालविवाह रोखण्यासाठी बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कार्यान्वित असून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २०२२ तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यात बालविवाह रोखण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील ग्रामीण भागासाठी ग्राम सेवकांना तसेच नागरी भागासाठी नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात बाल विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी अनुक्रमे अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करण्यात आलेले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षामार्फत बाल विवाहाच्या प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन नियमितपणे करण्यात येते.

केंद्र शासनाच्या "बाल विवाह मुक्त भारत अभियान" या मोहिमेंतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये बाल विवाह प्रथा संपूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी मोहिम राबविण्यात येत आहे.

गाणे-खडपोली (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील मे.साफ यीस्ट कंपनी प्रा.लि. मधील कामगारांना कामावरुन कमी केल्याबाबत

(११) * **१५६७०** **श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाणे-खडपोली (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील मे.साफ यीस्ट कंपनी व्यवस्थापनाने कंपनीमध्ये अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या २६० कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान कामावरुन कमी केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाविरोधात अन्यायग्रस्त कामगारांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी तसेच कामगार विभागाचे अधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील सबंधित सर्व प्रशासकीय अधिकारी यांना निवेदन देऊन तसेच आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान देऊनही अद्याप या कामगारांना कंपनीने सामावून घेतलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामथे हरेकरवाडी (ता.चिपळूण) येथील नदीमध्ये याच मे.साफ यीस्ट कंपनीने माहे जून, २०२५ मध्ये टँकरमधून रासायनिक पाणी सोडल्याचे निदर्शनास आल्यानंतर कंपनी व्यवस्थापन आणि अधिकारी यांचा हितसंबंध असल्याने कंपनीवर तात्पुरती कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तीनही प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकारी आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी २२० कंत्राटी कामगारांना कंपनी व्यवस्थापनाने कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरून कमी केले, ही बाब खरी आहे.
(२) हे खरे आहे.

आमरण उपोषण करण्यासंदर्भातील दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी कामगार कार्यालयात सर्व सबंधितांची बैठक आयोजित केली असता कामावरून कमी केलेल्या २२० कंत्राटी कामगारांपैकी यापूर्वी १३० कंत्राटी कामगारांना दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२५ रोजी कामावर घेण्यात आलेले आहे व उर्वरीत ९० कामगारांपैकी दिनांक १४ ऑक्टोबर,२०२५ रोजी २० कामगारांना तर दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ पूर्वी २० कामगारांना कामावर रुजू करुन घेण्याविषयी सर्वानुमते ठरले. तसेच उर्वरीत ५० कामगारांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पूर्वी कामावर पूर्ववत घेणेविषयी व्यवस्थापनाने सकारात्मक धोरण जाहिर करणे विषयी ठरले.

सद्य:स्थितीत कंपनीमध्ये २२० पैकी १७० कंत्राटी कामगार कार्यरत असून उर्वरीत ५० कामगारांना कामावर पूर्ववत रुजू करुन न घेतल्याने सदर ५० कामगारांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ पासून कंपनी गेटसमोर आमरण उपोषण सुरु केले होते. अखेर दिनांक १८ नोव्हेंबर,२०२५ रोजी झालेल्या चर्चेनुसार एकूण २०१ कंत्राटी कामगारांना पूर्ववत कामावर रुजू करुन घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला व २० कामगारांबाबत स्वतंत्र बैठक घेण्याबाबत ठरले तरी याबाबत कामगार व व्यवस्थापन यांच्यामधील वादाच्या मुद्याचे निराकरण झाल्याने कामगारांनी सदरचे आंदोलन स्थगित केले आहे.
(३) याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मे.साफ यीस्ट कंपनी प्रा.लि., प्लॉट नं. सी-३, एम.आय.डी.सी., गाणे खडपोली, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी या उदयोगाला मंडळाने दिलेल्या संमतीपत्रात कोकण कृषी विद्यापीठाच्या अहवालानुसार अंशत: प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी शेतजमिनीत खतसिंचन (Ferti-Irrigation) म्हणून वापरण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार माहे जून, २०२५ मध्ये सदर टँकर हे इस्लामपूर, जि.सांगली येथे नेण्यात येत होते. तथापि, टँकरच्या चालकाने रस्त्यामध्येच टँकरमधील सांडपाणी नदीत सोडल्याचे निदर्शनास आले. म.प्र.नि. मंडळाच्या नियमाप्रमाणे संमतीपत्रातील अटी शर्थींचे उल्लंघन करणे व पर्यावरणास हानी पोहोचवणे यासाठी मे.साफयीस्ट कंपनी प्रा.लि., या उदयोगाला जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अन्वये उत्पादन बंदचे निर्देश दिनांक २३ जून,२०२५ रोजी देण्यात आले होते.

उद्योगाने पाणी बजेट आणि सद्य:स्थितीतील सांडपाणी प्रक्रिया योजना तसेच शून्य द्रव निकसन (ZLD) साध्य करण्यासाठीची कालबद्ध कृती योजना मंडळाकडे सादर केली. तद्नंतर अटी आणि शर्तीचे पालन करून उद्योगाला उत्पादन चालू करण्याचे निर्देश दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ रोजी देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

राज्यात नियमांचे उल्लंघन करुन रक्त संकलित करणाऱ्या रक्तपेढयांवर कारवाई करणेबाबत

(१२) * १५६३१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) राज्यातील खाजगी व सरकारी रक्तपेढ्यांना दरवर्षी किमान दोन हजार युनिट रक्त संकलित करण्याच्या नियमाचे पालन करण्याचे आदेश राज्य रक्त संक्रमण परिषदेने दिले असूनसुद्धा सदर नियमांचे उल्लंघन रक्तपेढ्या करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही दिवसांपूर्वी रक्तपेढ्यांना रक्त वाया जाते म्हणून मोठी शिबिरे घेण्यासही मनाई केली आहे व नियमांचे उल्लंघ करण्याऱ्या रक्तपेढ्यांचे परवाने रद्द करण्याचाही इशारा शासनाकडून देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सोलापूर शहर हे रक्तदान शिबिर घेण्यात आघाडीवर असून येथून इतर राज्यात रक्त तस्करी केली जात असून येथील काही रक्तपेढ्या नियमांचे उल्लंघन करुन ६० मिली जादा रक्त घेत असून सदर रक्त, प्लाजमा परस्पर विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सर्व रक्तपेढ्यांचा आढावा घेऊन नियमांचे उल्लंघन करुन रक्त संकलित करण्याऱ्या रक्तपेढयांवर तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्य रक्त संक्रमण परिषदेने दिनांक ०८ जुलै, २०२५ व १६ जुलै, २०२५ च्या पत्रान्वये, राज्यात कार्यरत असलेल्या एकूण ४०२ रक्तपेढ्यांपैकी ज्यांचे वार्षीक संकलन २००० रक्त पिशव्यांपेक्षा कमी आहे अशा ५२ रक्तपेढ्यांना किमान २००० रक्त पिशव्या संकलित करण्याबाबत सूचीत केले आहे. तसेच अतिरिक्त रक्त संकलन होऊन ते मुदतबाह्य होऊन वाया जावू नये यासाठी रक्तपेढ्यांनी मोठी रक्तदान शिबिरे आयोजित करणे टाळावे व एका रक्तदान शिबिरामध्ये जास्तीत जास्त ५०० रक्त पिशव्यांच्या वर रक्त संकलन होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना जारी करण्यात आल्या होत्या. तथापि, रक्तपेढ्यांचे परवाने रद्द करण्याचा इशारा देण्यात आलेला नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, यासंदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यामधील रक्तकेंद्रांची औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील नियमांच्या अनुषंगाने, अन्न व औषध विभागामार्फत दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ व ११ ऑगस्ट, २०२५ रोजी केंद्रीय औषध नियंत्रकांसोबत संयुक्तिक व सखोल तपासणी करण्यात आली होती. प्राथमिक चौकशीत त्रुटी आढळून आलेल्या जिल्ह्यातील एकूण १२ रक्तकेंद्रांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून पुढील नियमोचीत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील आरोग्य विभाग, पाणी व स्वच्छता विभागांमध्ये झालेला गैरव्यवहार

(१३) * **१६०६४ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील आरोग्य विभाग, पाणी व स्वच्छता विभागांमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेच्या अंशदान रक्कमेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहार हा अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने झाल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची विभागीय आयुक्तांमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी कामगार संघटनेकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१), (२), (३) व (४) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील आरोग्य विभाग, पाणी व स्वच्छता विभागांमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेच्या अंशदान रकमेतील गैरव्यवहाराबाबत त्रयस्थ व्यक्ती श्री. प्रसाद गावडे यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे सखोल चौकशीची मागणी केली होती.

त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक २६ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर प्रकरणी परिपूर्ण पडताळणी करून, योग्य ती नियमोचित कार्यवाही करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्राने श्री. मनोज बेहरे, सहा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित केली होती. सदर चौकशी समितीने दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी गैरव्यवहार झाला असल्याचे आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील नर्सिंग प्रशिक्षणार्थी मुलींच्या वसतिगृहात पुरुष वॉर्डन नियुक्त केल्याबाबत

(१४) * **१५५९३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या नर्सिंग प्रशिक्षणार्थी मुलींच्या वसतिगृहात काउंसिल ऑफ इंडियाच्या नियमानुसार केवळ महिला वॉर्डन असणे बंधनकारक असताना तेथे पुरुष वॉर्डनची नियुक्ती करण्यात आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील असलेल्या मुलींच्या वसतिगृहात ११ पुरुष वॉर्डन तर जिल्हा रुग्णालय वर्धा, भंडारा, बुलढाणा, ठाणे तसेच स्कुल ऑफ पब्लिक हेल्थ, नागपूर व जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथे प्रत्येकी ३ पुरुष वॉर्डन कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही ठिकाणी या नियुक्त्या सरळ सेवा भरतीने झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समाज कल्याण व आदिवासी विकास विभागाच्या मुलींच्या वसतिगृहात फक्त महिलाच वॉर्डन कार्यरत असतात परंतु आरोग्य विभागात सदर नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील मुलींच्या वसतिगृहात पुरुष वॉर्डनची नियुक्ती करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

वॉर्डन या पदाच्या दिनांक १७ मार्च, १९६६ रोजीच्या सेवाप्रवेश नियमानुसार वॉर्डन संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत सन २०२१ व २०२३ मध्ये राबविण्यात आलेल्या पदभरती प्रक्रियेतून वॉर्डन संवर्गातील एकूण १५ रिक्त पदे भरण्यात आली होती. त्यापैकी १३ पदांवर पुरुष कर्मचाऱ्यांची तर २ पदांवर महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(४) सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाशी संलग्न महिला वसतिगृहातील वॉर्डन या पदावरील नियुक्ती दिनांक १७ मार्च, १९६६ रोजीच्या सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात येत असून सदर सेवाप्रवेश नियमात केवळ महिला उमेदवाराची भरती करण्याबाबत नमूद नसल्याने पुरूष वॉर्डनची नियुक्ती करण्यात आली आहे.
(५) भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकांनुसार महिला वसतिगृहामध्ये महिला वॉर्डन आवश्यक असल्याने ज्या परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाच्या वसतिगृहामध्ये पुरुष वॉर्डन कार्यरत आहेत अशा ठिकाणी वरिष्ठ वॉर्डन या पदाकरीता पात्र व जबाबदार महिला कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या/उसनवारी तत्वावर नेमणुक करणेबाबतच्या सूचना उपसंचालक (शुश्रृषा) आरोग्य सेवा, मुंबई यांनी दिनांक १५ जुलै, २०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व उपसंचालक, परिमंडळे यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त ३५ महिला वसतिगृहांपैकी ३२ ठिकाणी महिला वॉर्डनची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित ३ ठिकाणी महिला वॉर्डनची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना उपसंचालक (शुश्रृषा) आरोग्य सेवा, मुंबई यांच्या दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत वॉर्डन पदाच्या दिनांक १७ मार्च, १९६६ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकांनुसार परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाच्या वसतिगृहाकरीता वॉर्डन (स्त्री) अशी सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील अनधिकृत लॅबवर कारवाई करणेबाबत

(१५) * १६१६७ श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील १२ लॅबची कोल्हापूर बायोमेडिकल वेस्ट विभागाकडे नोंद नसल्याचे माहे, जुलै २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अधिकृत नोंदणी नसलेल्या व नियामक संस्थांच्या देखरेखीखाली नसलेल्या लॅबमार्फत रक्त तपासण्या केल्या जात असल्याने त्यांच्याकडून चुकीचे अहवाल दिले गेल्याने अनेक रुग्णांना चुकीचे उपचार मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाच रक्त तपासणीच्या नमुन्यावर दोन वेगळे अहवाल दिल्याची उदाहरणेही निदर्शनास आली असल्यामुळे लॅबच्या कार्यपद्धतीवर व तेथे कार्यरत कर्मचार्यांच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे रुग्णांची आर्थिक फसवणूक तसेच मानसिक त्रास देखील वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अशा अनधिकृत लॅबवर कारवाई करणेसह भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१), (२), (३) व (४) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडे तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.
(५) वैद्यकीय प्रयोगशाळा (मेडिकल लॅबोरेटरी) व्यवसायाचे अधिक प्रभावी नियंत्रण व नियमन करण्याकरीता स्वतंत्रपणे कायदा तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागातील बालमृत्यू, माता मृत्यू तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत

(१६) * १६८०१ श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बालमृत्यू रोखण्यासाठी कोटयवधी रुपये खर्चाच्या विविध योजना शासन राबवित असून देखील गेल्या तीन वर्षांत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्हयात शून्य ते पाच वर्ष वयोगटातील तब्बल ४९ हजार ८० बालमृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यातील आदिवासी भागात विशेषत: पालघर जिल्ह्यात मागील सहा महिन्यात ० ते ६ वयोगटातील तब्बल १३८ बालमृत्यू झाले असून २६९ बालके दुर्धर आजाराने ग्रस्त ६८ बालके तीव्र कुपोषित तर ८३५ बालके मध्यम कुपोषित अशी एकूण जिल्ह्यातील ९०३ बालके कुपोषणाच्या श्रेणी मध्ये आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास ध्येय धोरणानुसार सन २०३० पर्यंत नवजात मृत्यूदर कमी करावे असे उद्दिष्ट आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुपोषणग्रस्त समस्येचे उच्चाटन करण्यासाठी डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखालील समितीने काही शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागातील बालमृत्यू, माता मृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्यासह कुपोषणाचे प्रमाण कमी करून बालकांपर्यंत आरोग्य सेवा पोहचविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे, गेल्या तीन वर्षांच्या कालावधीमध्ये सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्हयात शून्य ते पाच वर्ष वयोगटामध्ये १४ हजार ५२६ बालमृत्यू झाले आहेत.
(२) राज्यातील आदिवासी विशेषत: पालघर जिल्हयातील ० ते ६ वयोगटातील बालमृत्यू आणि दुर्धर आजारग्रस्त बालकांसंदर्भातील प्रश्न भाग २ मधील वस्तुस्थिती खरी आहे.

तर ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील कुपोषित बालकांची माहे ऑक्टोबर २०२५ च्या आकडेवारीनुसार माहिती खालीप्रमाणे आहे -

एकूण वजन व उंची घेतलेली बालके	तिव्र कुपोषित बालके (SAM)	एकूण तपासण्यात आलेल्या बालकांच्या प्रमाणात टक्केवारी	मध्यम कुपोषित बालके(MAM)	एकूण तपासण्यात आलेल्या बालकांच्या प्रमाणात टक्केवारी
१३४३६२	३०३	०.२३	२६६३	१.९८

(३) होय, हे खरे आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास ध्येय २०३० नुसार नवजात मृत्यू दर हा प्रति १००० जन्मामागे १२ पेक्षा कमी करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या Registrar General व Census Commissioner of India यांनी माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये प्रकाशित केलेल्या Sample Registration System (SRS) २०२३ सर्व्हे नुसार महाराष्ट्र राज्याचा २०२३ सालचा नवजात मृत्यू दर हा प्रति १००० जन्मामागे ११ असून महाराष्ट्र राज्याने शाश्वत विकास ध्येयाचे लक्ष्य साध्य केलेले आहे.
(४) होय हे खरे आहे.
(५) ICDS अंतर्गत राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

पूरक पोषण आहार, नियमित आरोग्य तपासणी, डॉ. भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना (आदिवासी प्रकल्प), सॅम (SAM) बालकांसाठी विशेष उपक्रम, पोषण अभियान आणि जनजागृती, शहरी भागातील कुपोषण नियंत्रण, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, सुपोषित मुंबई, बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस' अभियान, या योजना राबविण्यात येतात. तसेच Nurture ॲप्लीकेशन अंतर्गत कुपोषीत बालकांचा पाठपुरावा घेण्यात येतो. सदर प्रणालीच्या वापराबाबत सर्व मुख्यसेविका/पर्यवेक्षिका तसेच अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

त्याचबरोबर आरोग्य विभागामार्फत खालील उपाय योजना राबविण्यात येत आहेत. संस्थात्मक प्रसुतीसाठी प्रोत्साहन, गरोदरपणामध्ये लवकरात लवकर (१२ आठवडयाच्या आत) नोंदणी, किमान ४ वेळा गरोदरपणी प्रसुतीपूर्व तपासणी व नियमित पाठपुरावा, अति जोखमीच्या मातांची तज्ञांमार्फत तपासणी, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान,जननी सुरक्षा योजना,जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, विशेष नवजात शिशु काळजी कक्ष - Special

New Born Care Unit (SNCU),नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष - (New Born Stabilization Unit (NBSU), कॉम्प्रिहेन्सिव्ह लॅक्टेशन मॅनेजमेंट सेंटर (सीएलएमसी), पोषण पुनवर्सन केंद्र (Nutrition Rehabilitation Centre-NRC),घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC), घरच्या घरी लहान बालकांची काळजी (HBYC), ''मा'' - Mother Absolute Affection (MAA), ॲनिमिया मुक्त भारत जीवनसत्व 'अ' कार्यक्रम, स्टॉप डायरिया कॅम्पेन (Stop Diarrhoea Campaign), Social Awareness and Action to Neutralize Pneumonia Successfully (SAANS), राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, नियमित लसीकरण इ.

(६) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील जल जीवन मिशन योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत

(१७) * १५६०० श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.विलास भुमरे (पैठण), डॉ.किरण लहामटे (अकोले) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाने सुरु केलेल्या जल जीवन मिशन कार्यक्रम योजनेंतर्गत ५२ हजार मंजूर कामांपैकी अद्यापी २५ हजार योजनांची कामे विविध कारणांमुळे अपूर्णावस्थेत असल्याने अनेक गावे नळपाणी योजना व पाण्यापासून वंचित राहिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: जळगाव व कोल्हापूर जिल्हयात ठेकेदारांची बिले थकविणे, निधी अभावी कामे प्रलंबित असणे, कामे निकृष्ट दर्जाची झाली असणे, ठाणे व पालघर जिल्हयात प्रस्तावित असलेली कामे ठेकेदारांमुळे प्रलंबित राहिल्यामुळे नळ जोडणी झाली नसणे, नाशिक जिल्हयात नवीन वीज कनेक्शन न मिळणे, लातूर जिल्ह्यात पाणी पुरवठा योजनेची अपूर्ण कामे पूर्ण न करणे, पुणे जिल्हयात सदोष अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रियेतील अनियमितता, प्रत्येक स्तरावर कमिशन घेणे, काही ठिकाणी कामे न करता बिले काढणे यासह त्रयस्थ संस्थेने देखील लाच घेऊन सदोष कामांची बिले काढण्यासाठी सहाय्य करणे, जालना जिल्हयातील कामे निकृष्ट दर्जाची असून त्यात आर्थिक गैरव्यवहार होणे, अहिल्यानगर जिल्हयात योजनेसाठी मंजूरी मिळूनही निधी व इतर अडचणीमुळे कामे प्रलंबित असणे तसेच या योजनांची कामे निधी अभावी ठेकेदार करीत नसणे, कंत्राटदार चालू कामांवर अवाजवी वाढीव अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीसाठी शासनास सादर करणे, धुळे जिल्हयातील शिरुड-७ या

गावामध्ये केवळ पाणीपुरवठा योजना मंजुर करणे, नागपूर जिल्हयात मंजुर पाणीपुरवठा योजना कामाचे क्वालीटी कंट्रोलमार्फत चौकशी करणे, छत्रपती संभाजी नगर जिल्हयात या योजनेशी संबंधित कार्यकारी अधिकारी अभियंता, कंत्राटदार, प्रकल्प व्यवस्थापन समिती (PMC), त्रयस्थ तपासणी यंत्रणा (TPI) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर करुन व संगनमत करुन निकृष्ट कामे व चुकीची मोजमापे नोंदवून मोठा गैरव्यवहार करणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ४७० योजनांमध्ये जल जीवन मिशन योजनेची कामे सुरु झालेली नसून यामध्ये रत्नागिरी, अकोला, हिंगोली, यवतमाळ, नांदेड, बीड, नंदुरबार, सांगली, भंडारा, गडचिरोली, सातारा, गोंदिया, परभणी, धाराशिव, सिंधुदर्ग, चंद्रपूर, लातूर इ. अनेक जिल्हयांमध्ये देखील सदर योजना अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेसाठी भांडवली गुंतवणुकीच्या प्रमाणात लोकवर्गणी २ हजार ४३ कोटी रुपये इतकी जमा करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात केवळ २१ कोटी ७१ लाख रुपये म्हणजे एक टक्काच वर्गणी जमा झाली असून लोकवर्गणी देणे शक्य नसल्यास, योजनेसाठी श्रमदान करण्यास मुभा देऊनही श्रमदान करण्यास व लोकवर्गणी देण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे तक्रारी, निवेदने देऊनही अद्यापही अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन या योजनांची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करुन यातील दोषी कंत्राटदार व कर्मचारी/अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत एकूण ५१५६० योजना समाविष्ट असून, त्यापैकी २६१३१ योजनांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरीत २५४२९ योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगती पथावर आहेत. पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर असलेल्या गाव/वाडीत अस्तित्वातील योजनांव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

(२) याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

माहे ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नाही. जलजीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून राज्य शासनातर्फे विशेष बाब म्हणून सन २०२४-२५ मध्ये रू. २४८३.५८ कोटी तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये रू.२१०३.२५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. निधी अभावी सदरच्या कामांच्या गतीवर विपरीत परिणाम झाला आहे, हे खरे आहे.

जल जीवन मिशन अतंर्गत योजनांच्या कामांची देखरेख विभागातील अभियंत्यांमार्फत व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या मार्फत वेळोवेळी करण्यात येते. तसेच झालेल्या कामांची शासनाने नियुक्त केलेल्या त्रयस्थ तपासणी यंत्रणांकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येते. त्रयस्थ तपासणी यंत्रणा यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. ज्या ठिकाणी मानकानुसार कामे झाली नाही तिथे कंत्राटदारांच्या खर्चातून सदर कामे मानकाप्रमाणे पूर्ण करण्यात येतात व त्यानंतर संबंधितांना कामाच्या प्रगतीनुसार देयके प्रदान करण्यात येतात. विहीत वेळेत कामे पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यात येते.

जल जीवन मिशन योजनांच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर वेळोवळी कार्यवाही करण्यात येते.

नाशिक जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत ११ योजनांची थकबाकी असल्याने नवीन वीज कनेक्शन मिळण्यास विलंब होत आहे.

वाड्या वस्त्या सुटणे तसेच उद्भवातील वर्तविलेला अंदाज चुकणे (Source Fail) इत्यादी कारणास्तव पाणीपुरवठा योजनांमध्ये बदल होतो. त्यानुसार जशी मागणी प्राप्त होते तसे योजनांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते.

धुळे जिल्हयात एकूण ५२० योजनांची कामे मंजूर असून २५७ योजना पूर्ण झाल्या आहेत तसेच २६३ योजना विविध टप्प्यावर प्रगती पथावर आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्हयामध्ये राबविण्यात येत असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या ७३ कांमामध्ये अनियमितता आढळून आली आहे. याबाबत संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला असुन संबंधितांचे खुलासा प्राप्त होताच पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल तसेच २५ योजनांची प्राथमिक चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) IMIS या भारत सरकारच्या एकात्मिक माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये २६० योजनांच्या नोंदी दुबार झाल्या आहेत. सद्या सदरच्या प्रणालीमध्ये दुरुस्ती करण्याची सोय नाही सदरहू सोय उपलब्ध झाल्यानंतर योग्य ती सुधारणा करण्यात येणार आहे. उर्वरीत १४२ योजनांची कामे जागेची उपलब्धता, स्थानिकांचा विरोध, विविध विभागाच्या परवानग्या मिळण्यास विलंब इत्यादी कारणास्तव सुरु करता येऊ शकल्या नाहीत.

(४) हे खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी भांडवली गुंतवणुकीच्या प्रमाणात लोकवर्गणी २ हजार २२६ कोटी रुपये इतकी जमा करणे आवश्यक आहे. रु.२२.०९ कोटी इतकी लोकवर्गणी जमा करण्यात आली आहे.

(५) हे खरे नाही.

योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रारी/ निवेदने यांची योग्य दखल घेऊन आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येते.

(६) जल जीवन मिशन अंतर्गत कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधितांविरुद्ध वेळोवळी कारवाई करण्यात येते, त्यानुसार जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या कामांमध्ये कसूर करणाऱ्या ६७ कत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात आले असून दोषी कत्राटदारांकडून रु.१२.८०१ कोटी दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच कामाची गती राखण्यास अपयशी ठरलेल्या एकूण १८८ कंत्राटदाराचे काम रद्द करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे ७६ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांना तसेच १७ त्रयस्थ तपासणी यंत्रणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच ७० कनिष्ठ अभियंता, १४९ उप अभियंता व १२ कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत तसेच कार्यकारी अभियंता संवर्गातील ४ व उपअभियंता संवर्गातील ३ अशा एकूण ७ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून बाह्यस्त्रोतातून कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता संवर्गातील एका अधिकाऱ्याच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या कामांमध्ये कसूर करणाऱ्या २३३ कंत्राटदारांना दंडीत करण्यात आले असून रु.५५.८४ कोटी दंड वसुल करण्यात आला आहे.

(७) विलंब झालेला नाही.

पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत

(१८) * १८०३७ श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाचे वार्ड क्रमांक २ मध्ये दोन रुग्णांनी कर्मचाऱ्यांच्या त्रासामुळे पलायन

केले तसेच एका महिला कैदी मनोरुग्णाने आत्महत्या केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर प्रकरणातील संबधितांवर कारवाई करणेसह रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता व सुरक्षा व्यवस्थेच्या त्रुटीबाबत परिणामकारक उपाययोजना करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) अंशत: खरे आहे.

येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या पुरुष विभागातील वार्ड क्र.२ मधील दोन मनोरुग्ण हे डिस्चार्ज नंतर नातेवाईक घरी घेऊन जात नसल्यामुळे वैफल्य ग्रस्त होऊन पळून गेले होते. त्यापैकी एक मनोरुग्ण सुखरुप घरी पोहचले असल्याची खातरजमा करण्यात आली आहे. तसेच, दुसरे मनोरुग्ण हे रुग्णालयाच्या आवारामध्येच सापडले असून त्यांना पुन्हा रुग्णालयामध्ये दाखल करुन घेण्यात आले असून, सध्या ते रुग्णालयात आहेत.

तसेच, एक महिला मनोरुग्ण ह्या Schizoaffective Disorder ने ग्रस्त होत्या. त्यांना उपचाराकरिता आंतररुग्ण म्हणून येरवडा मनोरुग्णालयात दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी दाखल करण्यात आले होते. सदर मनोरुग्णालयामध्ये स्वत:ची काळजी न घेणे, उपचारास सहकार्य न करणे, अत्यंत आक्रमकता, असंबंध्द बडबड, भ्रम होणे, संशय होणे, आत्महत्येची प्रवृत्ती दिसून येत होती. त्यामुळे त्यांना स्वतंत्र खोलीत स्त्री परिचर यांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. तथापि, रुग्णालयातील अन्य मनोरुग्ण Excite आणि Violent झाल्याने स्त्री परिचर त्या रुग्णास Injection देण्यासाठी गेल्या असता, सदर कालावधीत सदर महिला मनोरुग्ण अंगावरील गाऊन च्या सहाय्याने दिनांक ३ सप्टेंबर,२०२५ रोजी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. उपरोक्त घटना कर्मचाऱ्यांच्या त्रासामुळे घडलेल्या नाहीत.

(२) दोन रुग्णांच्या पलायनाबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचेमार्फत द्विसदस्यीय आणि आत्महत्येसंदर्भात वैद्यकीय अधीक्षक, येरवडा मनोरुग्णालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एक रुग्ण वैफल्यग्रस्त झाल्याने पळून गेल्याचे निष्पन्न झाले. सद्य:स्थितीत सदर रुग्ण कुटुंबियासमवेत आहे. तर दुसरा रुग्ण हा पलायन केलेला नसून तो रुग्णालयाच्या आवारातच आढळून आला असून सध्या सदर रुग्ण रुग्णालयातच आहे.

तसेच, महिला मनोरुग्णाच्या आत्महत्येसंदर्भात वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार, एक महिला मनोरुग्ण ह्या Schizoaffective Disorder ने ग्रस्त होत्या. त्यांना उपचाराकरिता आंतररुग्ण म्हणून येरवडा मनोरुग्णालयात दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी दाखल करण्यात आले होते. सदर मनोरुग्णालयामध्ये स्वत:ची काळजी न घेणे, उपचारास सहकार्य न करणे, अत्यंत आक्रमकता, असंबंध्द बडबड, भ्रम होणे, संशय होणे, आत्महत्येची प्रवृत्ती दिसून येत होती. त्यामुळे त्यांना स्वतंत्र खोलीत स्त्री परिचर यांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. तथापि, रुग्णालयातील अन्य मनोरुग्ण Excite आणि Violent झाल्याने स्त्री परिचर त्या रुग्णास Injection देण्यासाठी गेल्या असता, सदर कालावधीत सदर महिला मनोरुग्ण अंगावरील गाऊन च्या सहाय्याने दिनांक ३ सप्टेंबर, २०२५ रोजी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या.

(३) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सदर प्रकरणी समज देण्यात आली आहे.

तसेच, सुरक्षेकरीता एकूण ५३ सुरक्षारक्षक घेण्यास दिनांक १३ ऑगस्ट,२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १५ सुरक्षारक्षक अस्तित्वात असून उर्वरीत ३८ सुरक्षारक्षक भरतीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात महिलांसाठी वन स्टॉप सेंटर (सखी केंद्रे) स्थापन करणेबाबत

(१९) * १६९७३ श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांना मानसिक, शारीरिक, आर्थिक व सामाजिक छळ तसेच कायदेशीर अडचणींच्या प्रसंगी त्वरीत मदत मिळावी यासाठी “वन स्टॉप सेंटर” (सखी केंद्रे) ही योजना कार्यान्वित करण्यात आली असून सद्यःस्थितीत ३६ जिल्ह्यांमध्ये ५५ केंद्र कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत पीडित महिलांना एकाच छताखाली कायदेशीर सल्ला, वैद्यकीय मदत, पोलीस मदत, मानसोपचार, समुपदेशन, तात्पुरता निवारा व पुनर्वसन उपलब्ध करून दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, नांदेड, अकोला, अमरावती, नागपूर, जळगाव, चंद्रपूर, यवतमाळ आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये नव्याने “वन स्टॉप सेंटर” सुरू करण्यात आले असून उर्वरित १४ जिल्ह्यांमध्ये अद्याप बांधकाम प्रक्रिया, मनुष्यबळ भरतीतील विलंब, निधी वितरणातील अनियमितता व पायाभूत सुविधांच्या उभारणीत झालेल्या विलंबामुळे अद्याप सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कार्यान्वित नसलेली "वन स्टॉप सेंटर" लवकरात लवकर सुरु करणेसह सर्व केंद्र पोलीस, आरोग्य, कायदेशीर सहाय्य सेवांशी डिजिटलपणे एकत्रित करणारी २४x७ हेल्पलाईन, ऑनलाइन रेफरल प्रणाली व रिअल-टाईम प्रकरण ट्रॅकिंग यंत्रणा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) राज्यातील सर्व महिलांसाठी १८१ महिला हेल्पलाईन ही २४X७ हेल्पलाईन पूर्ण क्षमतेने सुरु करण्यात आलेली आहे. सदर हेल्पलाईनमार्फत गरजू महिलांना तात्काळ मदत होण्याच्या दृष्टीने नजिकच्या वन स्टॉप सेंटर मध्ये जाणेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येत आहे. गरजू महिलांनी कोणत्या ठिकाणाहून कॉल केला याचे Location सह ट्रॅकिंग रिअलटाईम ठेवण्यात येत असून त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील अंगणवाडयांना स्वमालकीच्या इमारती उपलब्ध करुन देणेबाबत

(२०) * १६२६३ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: गडचिरोली, बुलढाणा, परभणी, नागपूर, सोलापूर जिल्ह्यातील अनेक अंगणवाडयांना

त्यांची स्वालकीची जागा नसल्याने त्या व्यायामशाळा, खाजगी भाड्याच्या जागा, शेड, ग्रामपंचायतीच्या जागा, प्राथमिक शाळा किंवा समाज मंदिरे येथे भरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंगणवाड्यांमध्ये अपुरा प्रकाश, कोंदट वातावरण, शौचालयाची कमतरता तसेच शारीरिक विकासासाठी तालबद्ध हालचाली, नृत्य, अभिनय गीते शिकवताना येत असलेली मर्यादा इत्यादी समस्यांना बालक व अंगणवाडी सेविकांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडयांना स्वतंत्र इमारती उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा याजेनेंतर्गत राज्यात ग्रामीण, आदिवासी व नागरी प्रकल्प कार्यक्षेत्रात एकूण ११०६६४ अंगणवाडी केंद्र मंजूर असून पैकी ११०६२४ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. कार्यरत अंगणवाडी केंद्रांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे :-

स्व:मालकीच्या इमारतीत कार्यरत	भाड्याच्या इमारतीत	शाळा इमारतीत	इतर ठिकाणी कार्यरत
७२३७१	२२७४३	७९९९	७५११

बुलढाणा, गडचिरोली, परभणी, सोलापूर व नागपूर या जिल्ह्यांमधील अंगणवाडी केंद्र इमारतींची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

जिल्ह्याचे नाव	मंजूर अं.वाडी केंद्र	स्व-मालकीची अं.वाडी केंद्र	भाड्याच्या इमारतीत कार्यान्वित अं.वाडी केंद्र	शाळा इमारतीत कार्यान्वित अं. वाडी केंद्र	समाज मंदिर, ग्रामपंचायत, इत्यादी ठिकाणी
बुलढाणा	२९६९	१७८७	३१८	५६६	२९८
गडचिरोली	२४०२	१७४०	५७१	५६	३५
परभणी	१८४४	१३३९	२१८	१५८	१२९
सोलापूर	४७७५	२८३०	५४३	५९१	७७१
नागपूर	३४०४	२०४१	१११५	१८६	६२

सोलापूर जिल्ह्यातील रे नगर येथे ४० अंगणवाडी केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

(२) हे खरे नाही.

उपरोक्त अंगणवाडी केंद्रांमध्ये अपुरा प्रकाश, कोंदट वातावरण, शौचालयाची कमतरता तसेच शारीरिक विकासासाठी तालबद्ध हालचाली, नृत्य, अभिनय, गीते शिकवताना बालक व अंगणवाडी सेविकांना मर्यादा येतात अशी वस्तुस्थिती नाही. तसेच सन २०२४-२५ या वर्षात राज्यातील ज्या स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा उपलब्ध नव्हती अशा एकूण ९६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये शौचालय सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. तसेच जी अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीत भरवली जातात, त्या अंगणवाडी केंद्रांना वीज सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय व्यवस्था असल्याचे तपासून सदर इमारती अंगणवाडी केंद्रासाठी भाड्याने

घेण्यात येतात. तथापि, ज्या भाड्याच्या इमारतीमध्ये शौचालय सुविधा उपलब्ध नसेल अशा इमारतींच्या परिसरात सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था असल्याचे तपासून सदर इमारती अंगणवाडी केंद्रासाठी भाड्याने घेण्यात येतात.
(३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बाल सशक्तीकरण करिता कायमस्वरूपी किमान ३ टक्के निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर निधीमधून अंगणवाडी बांधकाम / दुरूस्ती करण्याचे प्रावधान आहे. त्याचप्रमाणे डोंगरी विकास कार्यक्रम, जिल्हा खनिज प्रतिष्ठाण, CSR उपक्रम इ. कार्यक्रमामधून देखील अंगणवाडी बांधकाम करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२१) * १५५८९ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात देण्यात येणारी व मंजूर केलेली २७ लाखांहून अधिक घरे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले असून राज्यात विशेषत: अमरावती, यवतमाळ, नांदेड, अहिल्यानगर, जालना, नागपूर, बुलढाणा, बीड, परभणी, नाशिक, गोंदिया, पालघर व धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्राप्त मागण्यांच्या तुलनेत घरकुलासाठी केंद्र शासनाकडून अपुरा निधी मिळत असल्याने घरकुलांची कामे अपूर्ण राहून गरजू लाभार्थी लाभापासून वंचित राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय सर्वेक्षणानुसार नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये सुमारे ७२,००० कुटुंबे बेघर आहेत, अमरावती जिल्ह्यातील लाभार्थ्यांना ५२ हजारांहून अधिक मंजूर घरांसाठी निधी मिळत नसल्यामुळे यामधील मजुरीसाठी राखून ठेवलेली रु.२८ हजार अनुदानाची रक्कम माहे मे, २०२५ पासून आजपर्यंत लाभार्थ्यांना मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन आदेशानुसार अनेक योजनांतील घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते माहे ऑक्टोबर, २०२५ पासून थांबविण्यात आल्यामुळे कंत्राटदार व पुरवठादारांची थकबाकी भागविण्यासाठी निधी अभावी अडचणी निर्माण झाल्या असून अनेकांनी आत्महत्येचा इशारा दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अमरावती जिल्ह्यात घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून लाभार्थ्यांकडे मजूरांकडून मजुरी रक्कम मिळविण्यासाठी तगादा लावला जात असणे, घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडे मजुरीचे पैसे देण्यास अडचणी येत असणे, मजुरी अभावी घरकुलांचे बांधकाम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील घरकुलांसाठी निधी उपलब्ध करुन देऊन बेघर कुटुंबांना घरकुले देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१) सदर योजनेकरिता केंद्र शासनाने पर्याप्त निधी दिला आहे. तथापि, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार SNA-SPARSH ही नवीन निधी वितरण प्रणाली कार्यान्वित करताना Software विषयक तांत्रिक अडचण आल्याने, निधी वितरणास विलंब झाला. परंतु, आता सदर प्रणाली सुरळित झाल्याने लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट निधी वितरीत करण्यात येत आहे.
(२) नागपूर जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण आवास प्लस सर्वेक्षण-२०२४ अंतर्गत ७५,२६९ कुटुंबांचे सर्वेक्षण केले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत घरकुल कामाचे ९० दिवसांचे एकूण २८,०८०/-एवढी रक्कम (मजुरी) देय आहे. सदर निधी अमरावती जिल्ह्यास मग्रारारोहयो कडून प्रलंबित असल्याने मजुरी अदा करण्यात आलेली नव्हती. परंतु माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये मग्रारारोहयो कडून निधी उपलब्ध झालेला असल्याने मजूरी अदा करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) अमरावती जिल्ह्यात मजुरी रकमेअभावी घरकुलाचे बांधकाम प्रलंबित नसून, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये निधी उपलब्ध झालेला असल्याने, मग्रारारोहयो कडून सर्व संबंधितांस मजूरी रक्कम अदा करण्यात येत आहे.
(५) सद्य:स्थितीत SNA-SPARSH प्रणालीमार्फत निधी लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये वितरीत करण्यात येत असून, यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कामगार रुग्णालयात आरोग्य विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करणेसह नवीन कामगार रुग्णालये उभारणेबाबत

(२२) * १६८११ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, नवी मुंबई, ठाणे येथील कामगार रुग्णालयांमध्ये (ESIC Hospitals) अनेक ठिकाणी सुविधांचा अभाव, वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या त्रुटी आणि उपचारांमध्ये गंभीर चुका आढळून आल्या असून वाशी व चेंबूर येथील ईएसआयसी रुग्णालयात शस्त्रक्रिया विभाग (OT Block) बंद असून मुंबईतील अनेक दवाखान्यांत तज्ज्ञ डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई आणि पालघर येथील कामगार रुग्णालयात सोयी सुविधांचा अभाव असून या रुग्णालयांची गुणवत्ता तपासणी (Quality Check) करण्यासाठी शासनाने समिती नेमली आहे काय,
(३) असल्यास, राज्यात औद्योगिक विस्तारामुळे कामगारांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने कामगारांच्या वाढत्या वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी चंद्रपूर, अमरावती, औरंगाबाद, पुणे, सांगली, अहिल्यानगर, नाशिक, बारामती, सातारा आणि रायगड या जिल्ह्यांत राज्य कामगार विमा महामंडळाकडून २०० खाटांची अत्याधुनिक रुग्णालये उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अस्तित्वात असलेल्या कामगार रुग्णालयांच्या प्रशासनातील त्रुटी दूर करणे व तेथे आरोग्यविषयक सोयी-सुविधा उपलब्ध करणेसह नवीन कामगार रुग्णालये उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई, नवी मुंबई, ठाणे येथे राज्य कामगार विमा योजनेतंर्गत वरळी, मुलुंड, परळ, कांदिवली, ठाणे, वाशी व उल्हासनगर या ०७ ठिकाणी राकावियो रूग्णालये कार्यरत आहेत.

राकावि महामंडळाच्या मालकीच्या ०४ रूग्णालयांपैकी ठाणे रूग्णालयाच्या ठिकाणी राकावि महामंडळाने नवीन इमारत उभारण्याचा निर्णय घेतला आहे. उल्हासनगर येथील नवीन इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आले असून राकावि महामंडळामार्फत अद्याप सदर नवीन इमारत शासनास हस्तांतरीत करण्यात आलेली नाही. वाशी रूग्णालयाच्या इमारतीचे राकावि महामंडळाकडून नुतनीकरण करण्यात आले असून सदर रूग्णालयाचा शस्त्रक्रिया विभाग राकावि महामंडळा कडून अद्याप महा-राकावि सोसायटी कडे हस्तांतरीत झालेला नाही. चेंबूर येथे राकावि रुग्णालय नसून त्या ठिकाणी सेवा दवाखाना कार्यरत आहे.

वरळी, मुलुंड, कांदिवली व महात्मा गांधी स्मारक या ०४ राकावियो रूग्णालयांमध्ये महा राकावि सोसायटीमार्फत वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री, कंत्राटी स्वरूपात विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, नर्सेस व समवैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करण्यात येऊन त्या ठिकाणी वैद्यकीय सेवांमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

राकावियोच्या वरील ०७ रूग्णालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या उपचारांमध्ये गंभीर चुका आढळल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

वसई येथे महा-राकावि सोसायटी मार्फत सेवा दवाखाना व पालघर येथे राकावि महामंडळा मार्फत डिस्पेंसरी कम ब्रॅन्च ऑफिस चालविण्यात येत असून, त्या ठिकाणी रूग्णालय कार्यरत नाही. वसई सेवा दवाखाना येथे बाह्यरूग्णांची संख्या कमी असल्याने दिनांक १५ ऑक्टोबर,२०२५ रोजी संचालक (वैद्यकीय) यांनी दूरचित्रवाणी परिषदेद्वारे (VC) बाह्यरूग्णांची संख्या वाढविण्यासाठी कामगारांमध्ये राकावि योजने बाबत जागरूकता व्हावी यासाठी जागरूकता आणि प्रतिबंधात्मक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

राज्यात औद्योगिक विस्तारामुळे कामगारांच्या संख्येत वाढ झाल्याने राज्यात सातारा, पेण, जळगाव, पालघर, चाकण, शेंद्रा, सिन्नर, वाळुंज, बारामती, अमरावती, बल्लारपूर, वर्धा, रत्नागिरी, सांगली, अहिल्यानगर, कर्जत, पनवेल व खोपोली या ठिकाणी राकावि महामंडळाच्या मानकांनुसार आवश्यक खाटांची एकूण १८ नवीन रूग्णालये स्थापित करावयाचा निर्णय राज्य कामगार विमा महामंडळाने घेतला आहे.

(४) राकावि योजनेतील सेवा व सुविधांबाबत वेळोवळी आढावा बैठका घेऊन राज्यातील राकावियो रूग्णालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा अधिक परिणामकारक व सुलभरित्या पुरविण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

प्रस्तावित नवीन १८ राकावि रूग्णालयांपैकी १६ रूग्णालयांकरीता शासना मार्फत जमीन उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यापैकी चाकण, सातारा, बारामती, जळगाव, वर्धा, अमरावती व सिन्नर या ०७ रूग्णालयांच्या जमिनीच्या भूसंपादनास राकावि महामंडळाने मान्यता दिली आहे. सांगली व वाळूंज या ०२ रूग्णालयांच्या जमीनीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव राकावि महामंडळ मुख्यालयास सादर करण्यात आला आहे. शेंद्रा, पालघर, कर्जत, पेण व बल्लारपूर या ०५ रूग्णालयाच्या जमिनीस राकावि महामंडळाच्या स्थळ निवड समितीकडून शिफारस करण्यात आली असून संबंधित विभागाकडून देकारपत्र निर्गमित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. रत्नागिरी व अहिल्यानगर या ०२ रूग्णालयांच्या जमिनीबाबत राकावि महामंडळाच्या स्थळ निवड समितीमार्फत तपासणी करण्यात येत आहे. उर्वरीत पनवेल व खोपोली येथील ०२ रूग्णालयाबाबत राकावि

महामंडळ व जिल्हाधिकारी/वन विभाग यांच्या कार्यालयामार्फत जमीन निश्चित करणेबाबत समन्वय साधून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) महा राकावि सोसायटीमार्फत विमाधारकांना अधिक सुलभतेने व परिणामकारकरित्या वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असल्याने तसेच शासना मार्फत नवीन प्रस्तावित १८ रूग्णालयां करीता जमीन उपलब्ध करून देण्यात येत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील कॅन्सर रुग्णालय व रिसर्च सेंटरचे बांधकाम पूर्ण करून कार्यान्वित करणेबाबत

(२३) * १६५०६ श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरातील चार एकर क्षेत्रात शासनाने १०० खाटांचे कॅन्सर रुग्णालय व रिसर्च सेंटर उभारण्याची मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरीता नेमण्यात आलेल्या वास्तुविशारदने (आर्किटेक्ट) सदर कामाचे ड्रॉईंग व इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केलेली असून रुग्णालयाचे काम सुरू होण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी पासून नियमित पाठपुरावा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, तत्कालीन मा. वित्तमंत्री यांनी या रुग्णालायाकरीता मशीन खरेदी करिता मंजूर केलेला पहिल्या टप्प्यातील रु.२० कोटी इतका निधी परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मशिनरी खरेदीसाठी हाफकिनकडे निधी असतानाही कोणतीच कार्यवाही न केल्याने निधी परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कॅन्सर रुग्णालय व रिसर्च सेंटरचे बांधकाम तातडीने पूर्ण करून कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर च्या परिसरातील ०५ एकर क्षेत्रात कर्करोग उपचाराच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रेडीओथेरॅपी विभागाचे श्रेणीवर्धन अंतर्गत बांधकाम करण्यासाठी दिनांक ०६ मार्च, २०१९ रोजीच्या शासननिर्णयाद्वारे एकूण रु.७६.१० कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
सदर बांधकाम नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्याकडून सुरु असून सद्य:स्थितीत सदर बांधकामाचे ६०% काम पूर्ण झाले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
सदर यंत्रखरेदी करीता हाफकीन स्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. परंतु निविदेला प्रतिसाद प्राप्त न झाल्याने निविदा रद्द करुन निधी शासन जमा करण्यात आला आहे. तथापि, सद्य:स्थितीत वैद्यकीय शिक्षण संचालनालय स्तरावर सदर यंत्र खरेदीची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सद्य:स्थितीत बांधकामाचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील गिग कामगारांसाठी कल्याणकारी कायदा मंजूर करण्याबाबत

(२४) * २०७१२ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करणे, फूड डिलिव्हरी करणे इ. तत्सम कामे करणाऱ्या कामगारांना गिग कामगार म्हणून संबोधले जात असून महाराष्ट्रात सुमारे ८-१० लाख गिग कामगार कार्यरत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सदर कामगारांना सद्य:स्थितीत किमान वेतन कायदा, कामाचे तास, अतिरिक्त कामाचे वेतन, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा यांसारख्या सामाजिक सुरक्षेच्या सवलती लागू करण्याबाबत कोणताही कायदा अस्तित्वात नसल्याने, काही ठिकाणी सदर कामगारांची पिळवणूक होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील गिग कामगारांद्वारे राजस्थान आणि कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील गिग कामगारांसाठी कल्याणकारी कायदा मंजूर करण्याची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन राज्यातील गिग कामागारांसाठी कल्याणकारी कायदा मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१), (२), (३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) गिग कामगारांचे प्रतिनिधी, गिग क्षेत्रातील संबंधित कंपन्या आणि या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींशी चर्चा करून, गिग कामगारांबाबत धोरण तसेच याबाबत कायद्याचे प्रारूप तयार करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनांची अंमलबजावणी करणेबाबत

(२५) * १५७४१ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी

ग्रामीण), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये नवीन २ हजार ३९९ उपचारांना दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये पाच लाखरुपयांपेक्षा जास्त रकमेच्या उपचारांसाठी वेगळा राखीव निधी उभारण्याचा व या निधीतून हृदय, फुफ्फुस व मूत्रपिंड प्रत्यारोपण तसेच बोन मॅरो प्रत्यारोपण यांसह नऊ विविध उपचारांची शिफारस मान्य केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील २० खाटांपेक्षा कमी क्षमतेच्या रुग्णालयांचा या योजनेत समावेश करण्याचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासह या दोन्ही योजनांतर्गत उपचारांची मंजुरी प्रक्रिया सुलभ व गतिमान करण्यासाठी तसेच रुग्णांना त्यांच्या देयकांची अंमलबजावणी वेळेवर होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यात विस्तारित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रूग्णालय अंगीकरणासाठी आकांक्षित जिल्ह्यांमध्ये खाटांच्या मर्यादेत शिथिलता देऊन २० खाटांच्या खाजगी रूग्णालयांचे अंगीकरण करण्यात येते. तर अन्य जिल्ह्यांमध्ये योजनेंतर्गत रूग्णालय अंगीकरणासाठी ३० खाटांची मर्यादा कायम आहे.

(४) विस्तारित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचविण्यासाठी विविध प्रसार माध्यमातून (दृक-श्राव्य माध्यमे, प्रिंट माध्यमे, डिजीटल माध्यमे) योजनेची व्यापक प्रमाणात प्रचार-प्रसिद्धी करण्यात येते.

योजनेंतर्गत अंगीकृत रूग्णालयांना त्यांच्या देयकांची अदायगी वेळेवर होण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या TMS २.० प्रणालीचा अवलंब करण्याची प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात साथीचे रोग नियंत्रित ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(२६) * १६७०८ श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा

कळवा), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय देरकर (वणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व प्रदूषणामुळे सर्वत्र मलेरिया, डेंग्यू, गॅस्ट्रो, स्वाईन फ्लू, कोविड-१९ (व्हायरलफिव्हर), हिवताप, लेप्टो, इन्फ्ल्युएन्झा व इतर जलजन्य साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षाच्या तुलनेत या वर्षी मलेरियाच्या ६२७७, गॅस्ट्रोच्या ५९८९, डेंग्यूच्या २७२४ तर कोरोनाच्या १११६ रुग्णांची नोंद झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशात सन २०२७ पर्यंत हिवताप रुग्णसंख्या शून्यापर्यंत आणून सन २०३० पर्यंत हिवतापाचे उच्चाटन करणे शासनाचे उद्दिष्ट असले तरीही राज्यात हिवतापाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून हिवतापाचे सुमारे १८,५६० रुग्णांपैकी १३ जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार साथीचे रोग नियंत्रित ठेवणे तसेच या आजारासंदर्भात जनजागृती करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

राज्यात माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०२४ व २०२५ अखेर आजारांची तुलनात्मक माहिती खालीलप्रमाणे :-

आजाराचे नाव	जानेवारी ते ऑक्टोबर,२०२४ अखेरची रुग्ण संख्या		जानेवारी ते ऑक्टोबर, २०२५ अखेरची रुग्ण संख्या	
	लागण	मृत्यू	लागण	मृत्यू
हिवताप (मलेरिया)	१८०९२	२०	१९८५५	२०
डेंग्यू	१६८४५	२६	११९९०	१३
लेप्टोस्पायरोसिस	८७५	१	७८७	१
इन्फलुएंझा (स्वाईन फलू)	२२५६	५६	८९४	५
गॅस्ट्रो	२४७८९	४	२२३६७	०
कावीळ	२८०५	१	३१९७	३
अतिसार	३०८३८९	६	३४२४३५	०
कॉलरा	१००२	४	२०२	३
विषमज्वर	३९०७७	०	३९८६६	०
कोवीड (कोरोना)	५५२४	३५	२७८१	४६

गत वर्षाच्या तुलनेत या वर्षी एकूण रुग्ण वाढ दिसून येत असली तरी मृत्यूमध्ये घट झाल्याचे दिसून येते.
(३) हे अंशतः खरे आहे.

देशात सन २०२७ पर्यंत हिवताप रुग्णसंख्या शून्यापर्यंत आणून सन २०३० पर्यंत हिवतापाचे उच्चाटन करणे शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी जास्तीत जास्त सर्वेक्षण करुन गतवर्षी माहे जाने ते ऑक्टोबर,२०२४ मध्ये १८४७८३४४ इतक्या तर, चालूवर्षी याच कालावधीत १९९५७९०२ इतक्या रक्त नमुन्यांची तपासणी केली आहे. सर्वेक्षणात वाढ झाल्याने बाधित रुग्ण संख्येत वाढ दिसून येते. हिवताप बाधित रुग्णांपैकी २० जणांचा मृत्यू झाले आहेत. गडचिरोली जिल्हयामध्ये १४ मृत्यूची नोंद झाली आहे.

हिवतापाच्या बाबतीत बृहन्मुंबई व गडचिरोली जिल्हा वगळता बाकीच्या इतर सर्व जिल्हयांचा वार्षिक रोग जंतु निर्देशांक हा १ पेक्षा कमी आहे.

(४) शासन स्तरावर वेळोवेळी साथरोग आढावा बैठका घेऊन आवश्यक प्रभावी उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. हिवताप, डेंग्यू हे आजार अधिसूचित आजार म्हणून घोषित केले आहेत. तसेच, साथरोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी उच्च स्तरीय समिती दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत केली आहे. गडचिरोली जिल्हयातील मलेरिया नियंत्रणासाठी कार्यगटाचे (Task Force) पुनर्गठन करण्यात आले आहे. तसेच, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चिकुनगुनिया आणि डेंग्यू प्रादुर्भाव सनियंत्रित करणेसाठी उपाययोजना करणेबाबत शासन निर्णय दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

साथीचे रोग प्रतिबंधासाठी उपाययोजना -

• घरोघरी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण, निश्चित निदानासाठी राज्यामध्ये हिवतापाच्या ८९ व डेंग्यू करिता ५० प्रयोगशाळा कार्यान्वित, १३ महानगरपालिकांना सर्वेक्षणासाठी ब्रीडिंग चेकर्सच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा केला आहे.
• डासोत्पत्ती रोखण्यासाठी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळणे, प्रभावी एकात्मिक कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करणे, ऑक्टोबर २०२५ अखेर ९३४१८ इतक्या डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडले आहेत.
• केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनतेमध्ये हिवताप कार्यक्रमाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी माहे जून मध्ये हिवताप प्रतिरोध महिना व माहे जुलै मध्ये डेंग्यू प्रतिरोध महिना विविध उपक्रमाद्वारे (एक दिवस एक उपक्रम) राबविण्यात येतो. दरवर्षी जागतिक हिवताप दिन (२५एप्रिल) आणि राष्ट्रीय डेंग्यू दिन (१६ मे) विविध उपक्रमांसह साजरा केला जातो.
• शालेय आरोग्य शिक्षणांतर्गत शालेय विदयार्थ्यांना डासआळी प्रात्यक्षिक दाखवून त्या नष्ट करावयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रभात फेरी, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अशा उपक्रमांव्दारे डेंग्यूची जनजागृती केली जाते. किटकजन्य आजारावर नियंत्रणाकरीता लोकसहभागासाठी नागरिकांना आरोग्य शिक्षण देण्यात येते.
• नवीन डेंग्यू व्यवस्थापन व उपचार पध्दतीचे प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) भीषक (फिजीशियन), बालरोग तज्ञ यांना देण्यात आले. या प्रशिक्षकांनी त्यांचे विभागातील वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले आहे.
• बृहन्मुंबई व गडचिरोली जिल्हयामध्ये साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या राज्य कोट्यातील प्रवेश प्रक्रियेत बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रवेश मिळविल्याबाबत

(२७) * १५८४५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या राज्य कोट्यात परराज्यातील विद्यार्थ्यांनी तिसऱ्या फेरीतील प्रवेश प्रक्रियेत बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रवेश मिळविल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी)

प्राथमिक तपासणी केली असता १५२ विद्यार्थ्यांनी चुकीची माहिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी) सखोल तपासणी सुरू करण्यात आली असून सदर विद्यार्थ्यांचा तपशील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या वैद्यकीय समुपदेशन परिषदेकडून मागविल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चुकीची माहिती आणि बनावट कागदपत्रे जोडून अर्ज केलेल्या संबंधित विद्यार्थ्यांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मूळ आणि खरी कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापैकी केवळ एका विद्यार्थ्यानेच आपली कागदपत्रे सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर अपलोड केली असून उर्वरित १५१ विद्यार्थ्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या विद्यार्थ्यांनी दिलेले ई-मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक आणि इतर तपशील चुकीचे असून प्रथमदर्शनी यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) हे खरे आहे.

(२) सदर उमेदवारांचे तपशील उपलब्ध करुन देण्याची विनंती राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगास राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई च्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५, दिनांक २४ ऑक्टोबर, २०२५, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५, व दिनांक ३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या ई-मेल द्वारे करण्यात आली असून माहिती उपलब्ध करून घेण्याकरिता पाठपुरावा सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) १५१ उमेदवारांनी दिलेले ईमेल आयडी, दूरध्वनी क्रमांक व इतर तपशीलाची माहिती राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगामार्फत उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रकरणी निष्कर्षाप्रत येणे शक्य आहे.

(६) विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केलेल्या १५१ उमेदवारांना महाविद्यालयाचे वाटप करण्यात आलेले नसून पुढील प्रवेश प्रक्रियेतदेखील त्यांना सामील करुन घेण्यात आलेले नाही. तसेच सदर प्रकरणी आझाद मैदान पोलीस स्थानकात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

राज्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना पोषण आहार वाटपासाठी येत असलेल्या तांत्रिक अडचणींबाबत

(२८) * १५७७८ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत अंगणवाड्यांमधून पोषण आहाराचे वाटप करताना लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण (फेस रीडिंग) पद्धतीने लाभार्थींची ओळख पटवून नोंद करण्याची योजना सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण (फेस रीडिंग) पद्धतीमध्ये तांत्रिकदृष्ट्या अडचणी येत असून अंगणवाडी सेविकांना पोर्टल आणि नेटवर्कमधील अडचणींमुळे पोषण आहार वाटपाच्या प्रक्रियेत विलंब होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने पोषण आहार वाटपाच्या प्रक्रियेत अंगणवाडी सेविका आणि लाभार्थींना येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण (फेस रीडिंग) पद्धतीमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे आहे,
एकात्मिक बाल विकास सेवा या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता व आकांक्षित जिल्ह्यामधील किशोरवयीन मुलींना घरपोच आहार (THR) पुरवला जातो.

लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण (FRS) प्रक्रियेद्वारे घरपोच आहार वाटपाची सुविधा केंद्र शासनाद्वारे पोषण ट्रॅकर ॲपमध्ये "ऑक्टोबर-२०२४" पासून सुरू करण्यात आली होती आणि दिनांक १ जुलै, २०२५ पासून ही सुविधा सर्व राज्यांसाठी बंधनकारक करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या सुचनेनुसार FRS नुसार लाभार्थ्यांना पूरक पोषणाचा लाभ देणे आवश्यक आहे. त्यामुळे, सर्व लाभार्थ्यांची FRS ची १००% नोंद पोषण ट्रॅकर वर होणे आवश्यक आहे
(२) व (३) सुरवातीच्या कालावधीत FRS च्या नोंदी घेताना तांत्रिक अडचणी आल्या होत्या. तथापि सदर अडचणी सोडवून FRS च्या नोंदी लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी FRS (Facial Recognition System) प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प क्षेत्रात आधार नोंदणी शिबिरे आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे FRS करिता येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत:-
१) THR वाटप करताना चेहरा जुळल्यानंतर "OTP" ची आवश्यकता नाही. केवळ चेहरा प्रमाणीकरण द्वारे घरपोच आहार वाटप करण्याची सुविधा आहे.
२) आधीचा सत्यापित फोटो व्यवस्थित नसेल आणि त्यामुळे लाभार्थी यांचा चेहरा THR वाटप करत असताना जुळत नसेल तर पुन्हा फोटो काढण्याची आणि सत्यापित करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
३) सुरवातीला लाभार्थी यांना चेहरा प्रमाणीकरण प्रक्रियेमध्ये ऑनबोर्ड करण्यासाठी Ekyc करून फोटो काढणे आवश्यक आहे आणि त्यासाठी इंटरनेट सुविधेची एकदा गरज आहे. तदनंतर घरपोच आहार देताना लाभार्थी यांचा चेहरा प्रमाणीकरण करताना इंटरनेटची आवश्यकता नाही ही सुविधा विना इंटरनेट देखील उपलब्ध आहे. मात्र ५ दिवसातून हा डेटा एक वेळ Sync करणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांना देण्यात येणारा घरपोच आहार नियमितपणे देण्याच्या अनुषंगाने पोषण ट्रॅकर डेटानुसार ९४% लाभार्थ्यांची FRS मध्ये आधार फेस मॅपिंग झालेली असून FRS प्रणालीमध्ये नोंद झालेल्या अथवा अद्याप नोंद न झालेल्या सर्व लाभार्थ्यांना सद्य:स्थितीत वेळेत घरपोच आहार पुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राजे रघुजीनगर, नागपूर येथील येथील जलतरण तलावाच्या निकृष्ट बांधकामाबाबत

(२९) * १७२१४ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राजे रघुजीनगर येथील कामगार कल्याण केंद्राचा सन २०१९ पासून बंद असलेला जलतरण तलाव तब्बल ५ वर्षांनी पूर्ण झाला असतानाही तलावाला लागलेल्या गळतीमुळे हा तलाव नागरिकांसाठी अद्यापही खुला करण्यात आला नसल्याची बाब दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तलावाच्या दुरुस्तीसाठी आजमितीस दोन कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तलावाच्या दुरुस्तीचे निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदार आणि त्याला सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) होय, हे अंशतः खरे आहे.

करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शासन निर्देशानुसार दिनांक १३ मार्च, २०२० पासून राजे रघुजीनगर नागपूर येथील सदर जलतरण तलाव बंद करण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांचेमार्फत देखभाल दुरुस्ती कामे सुरु असताना माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये जलतरण तलावास गळती असल्याची बाब निदर्शनास आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने गळती रोखण्याची कामे माहे जुलै, २०२५ मध्ये पूर्ण केले असून जलतरण तलाव सुस्थितीत आहे. तसेच जलतरण तलावाच्या संचालन व देखभाल कामासाठी एजन्सी नियुक्तीबाबत कार्यवाही सुरु आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार जलतरण तलावाच्या दुरुस्ती / नुतनीकरण कामांसाठी रु.१९९.९० लक्ष रकमेस मान्यता देण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे

यातील रु.१६९.५४/- लक्ष निधी वर्ग करण्यात आला असून उर्वरित सुमारे रु.२९.९२ लक्ष निधी वर्ग करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जलतरण तलावाच्या दुरुस्ती कामातील त्रुटी दूर करण्यात आल्या असून सद्य:स्थितीत जलतरण तलाव सुस्थितीत आहे. सबब, कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मे.अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडला स्वस्तदराने दिलेल्या जमीनींचा करार रद्द करून भूखंड ताब्यात घेणेबाबत

(३०) * १५७६३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तळोजा औद्योगिक क्षेत्रात मे. अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडला यापूर्वी ४०० एकर जमीन स्वस्त दरात दिलेली असताना याच ठिकाणी आणखी १५९ एकर जमीन स्वस्त दरात उपलब्ध करून दिल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात झालेल्या करारामध्ये सदर भूखंड इतर कंपन्यांना भाडेपट्ट्यावर देण्यास अदानी समूहाला मान्यता दिली आहे, ज्यामुळे अदानी समूहाला सुमारे ९ हजार कोटींचा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंडाचे आताचे बाजारमूल्य काय आहे आणि कोणत्या दराने तो अदानी समूहाला देण्यात आला आहे, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे मूळ विकासक असताना यासंदर्भात झालेल्या करारामध्ये तोटा सहन करून अदानी समूहाला विकासक म्हणून भूखंड देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर व्यवहारामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अदानी समूहाला फायदा करून देण्यासाठी महामंडळाने शेतकऱ्यांकडून स्वस्त दराने घेतलेल्या जमिनीसंदर्भातील सर्व करार रद्द करून दोन्ही भूखंड ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : (१) व (२) हे खरे नाही.

दावोस येथील जागतिक आर्थिक परिषद, २०२४ मध्ये (WEF) मे. अदानी एंटरप्रायझेस लि. यांनी जागा मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनासोबत दिनांक १७ जानेवारी, २०२४ सामंजस्य करार (MOU) केलेला आहे. त्यानुषंगाने उद्योग विभागाकडून दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी “Green Integrated Data Centre Park” M/s. Adani Enterprises Limited, In Taloja, MMR, Navi Mumbai करीता Offer Letter निर्गमित करण्यात आले आहे.

मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड यांनी महाराष्ट्र शासनास दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी विनंती अर्ज व दिनांक १८ जून, २०२५ रोजी Priority Land Allotment सदराखाली Online Application सादर केले होते. त्या अनुषंगाने, दावोस येथील जागतिक आर्थिक परिषद २०२४ मध्ये (WEF) मे. अदानी एंटरप्रायझेस लि. यांनी जागा मिळण्यासाठी सामंजस्य करार (MOU) केलेला असल्यामुळे, अटी व शर्तीनुसार अर्जदाराला अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्रामधील मागणीनुसार तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रचलित धोरण व पर्यावरण, अभियांत्रिकी, नियोजन विभाग व भूखंड वाटप समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार अटीं व शर्तींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून "जसे आहे तसे व जेथे आहे तेथे (As is where is basis)" तत्वावर ४०० एकर क्षेत्राकरीता Comfort Letter देण्याचा निर्णय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंड वाटप समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला.

त्यानुषंगाने मऔवि महामंडळाकडून दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी सदर घटकास अति.तळोजा औद्योगिक क्षेत्राचा दर प्रति चौ. मी. रु.१५,४६०/- प्रमाणे ५% रक्कम भरणा करणे करीता Comfort Letter निर्गमित करण्यात आले. त्यानुसार मे. अदानी इंटरप्रायजेस लि.यांनी दिनांक २१ जुलै, २०२५ रोजी सदर रक्कमेचा भरणा केलेला आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये मऔवि महामंडळाने भूखंड वाटप करण्याकरीता MILAAP Portal विकसित केले आहे. त्यानुसार मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड यांना नवीन विकसीत करण्यात आलेल्या Milaap Portal वर अर्ज सादर करण्याबाबत दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी कळविण्यात आले आहे. तथापि, मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड यांचेकडून मऔवि महामंडळाच्या MILAAP Portal वर अद्याप अर्ज करण्यात आलेला नाही.

(३) व (४) मऔवि महामंडळाच्या दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार अति. तळोजा औद्योगिक क्षेत्राकरीता रक्कम रु.१५,४६०/- हा दर निश्चित केलेला असून, मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड यांना सदर दरानुसार Comfort Letter निर्गमित करण्यात आलेले आहे.

मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड हे सलग ४०० एकर क्षेत्र घेणार असल्याने, सदर क्षेत्रावर महामंडळास पायाभूत सुविधावर करावयास लागणारा खर्च जसे की, अंतर्गत रोड, दिवाबत्ती, अंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज व रेन वॉटर हार्वेस्टींग इत्यादींवर खर्च करावा लागणार नाही. तसेच मोठा भूखंड वाटप केल्याने भूखंडाचे तुकडीकरण व त्यानुसार रस्त्याखाली जाणारे क्षेत्र कमी होत असल्याने, मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या ४०७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.७०४५ अन्वये मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड यांना अति. तळोजा औद्योगिक क्षेत्रामध्ये वाटप करावयाच्या जागेमध्ये सदर कंपनी स्वतः विकास कामे

(Infrastructure Development) करणार असल्याने सदर कंपनीस रु.१२७३५/- प्रति. चौ.मी. दराने भूखंड वाटप करण्यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

तथापि, मे. अदानी इंटरप्रायजेस लिमिटेड यांचा मऔवि महामंडळाच्या MILAAP Portal वर अद्याप अर्ज प्राप्त झालेला नसल्याने, सदर घटकास भूखंड वाटप पत्र निर्गमित करण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील अंधेरी येथील अंगणवाडीत दिल्या जाणाऱ्या खिचडीमध्ये पोर किडे आढळल्याबाबत

(३१) * १५५९४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी येथील कर्तार रुग्णालया शेजारच्या दारुल सलाम अंगणवाडी क्रमांक १३६ मध्ये बालकांना दिल्या जाणाऱ्या खिचडीमध्ये पोर किडे आढळले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटनेने प्रकल्प विकास अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प यांचेकडे तक्रार केली असून त्यांनीही या प्रकारास दुजोरा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आहार पुरविणाऱ्या ग्रीष्मा महिला मंडळाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने या प्रकरणात संबंधित दोषी विरुद्ध कारवाई करण्यासह राज्यातील सर्वच अंगणवाडयांमध्ये दर्जेदार आहार पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे नाही.

दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी समाज माध्यमातून अंधेरी (मुंबई) येथील कर्तार रुग्णालयाच्या शेजारील दारूल सलाम अंगणवाडी क्रमांक १३६ मध्ये बालकांना दिलेल्या खिचडीत किडे दिसल्याचा एक व्हिडीओ प्रसारित झाल्याची बाब निदर्शनास आली. यानंतर, अंधेरी पश्चिम (नागरी) या प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांनी अंगणवाडीत प्राप्त झालेल्या आहाराची चौकशी करण्यासाठी सदर अंगणवाडीला भेट दिली.

सदर अंगणवाडी तसेच संबंधित महिला बचत गटाकडून ज्या इतर अंगणवाड्यांना गरम ताजा आहार पुरवठा होत आहे, तेथील कोणत्याही पालकांकडून गरम ताजा आहार पुरवठ्याबाबत कोणतीही तोंडी अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी अंगणवाडी कर्मचारी संघटनेची तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अंगणवाडी क्रमांक १३६ येथे आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटास खुलासा सादर करण्याविषयी कळविले होते. तसेच, सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता चौकशी समिती गठीत केली. त्यानुसार सदर समितीमधील सदस्यांनी अंगणवाडी क्रमांक १३६ मधील लाभार्थी व पालकांकडे दिनांक ३१ऑगस्ट, २०२५ रोजी प्राप्त झालेल्या गरम ताजा आहाराच्या दर्जाबाबत विचारणा केली. त्यावेळी कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या खुलाशामध्ये चांगल्या प्रतीचा आहार पुरवठा केल्याबाबत तसेच

भविष्यातही चांगल्या दर्जाचा आहार पुरवठा करण्यात येईल याची हमी दिलेली आहे.

अंगणवाडीस्तरावर गरम ताजा आहार पुरवठा होत असताना, सदर आहाराची केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार योग्यता तपासून पाहण्यासाठी, अंगणवाडीमध्ये प्राप्त होणाऱ्या गरम ताजा आहाराची रॅन्डमली NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली जाते. सदर तपासणी अंती आहार योग्य प्रथिने व उष्मांक (कॅलरी) युक्त आणि खाण्यास योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर आहाराची देयके अदा केली जातात.

अंगणवाडी स्तरावर गरम ताजा आहार प्राप्त झाल्यानंतर अंगणवाडी सेविका व मदतनीस प्रथम आहार योग्य आहे की नाही याची तपासणी करतात आणि त्यानंतरच लाभार्थ्यांना अंगणवाडीमध्ये आहार खाऊ घातला जातो.

अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केले जात नाही. तसेच, प्रकल्प स्तरावरून गरम ताजा आहाराच्या पुरवठ्याबाबत अंगणवाडी भेटी व किचन भेटी या माध्यमातून योग्य तो पाठपुरावा केला जातो.

खबरदारीचा उपाय म्हणून अंगणवाडी क्रमांक १३६ येथे पुरवठा झालेल्या आहाराचे नमुने NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी दिल्यानंतर आहार केंद्र शासनाच्या मानकांनुसार योग्य असून खाण्यास सुरक्षित असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कॅथलॅब सुविधा सुरू करणेबाबत

(३२) * १५६०७ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात हृदयविकाराच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने २७ ठिकाणी कॅथलॅब सुरू करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार अहिल्यानगरसोबत कार्यान्वित होणाऱ्या धुळे, बीड येथील कॅथलॅबचे उद्घाटन होऊन त्या सेवेत दाखल झाल्या, मात्र अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात कॅथलॅबची पदभरती प्रलंबित असल्याने सदर कॅथलॅब कार्यान्वित झाल्या नसल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे येथील जिल्हा रुग्णालयात कॅथलॅब केंद्र सुरु करण्याचा निर्णय दोन वर्षांपूर्वी घेतला मात्र गेल्या दोन वर्षांपासून कार्यादेश न निघाल्याने तेथील कॅथलॅब अद्याप सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रलंबित असलेल्या कॅथलॅब सुविधा तात्काळ सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत १९ ठिकाणी व राज्य निधीतून ४ ठिकाणी असे एकूण २३ ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब मंजूर करण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे आहे.

अहिल्यानगर येथील कॅथलॅबसंदर्भात AERB Registration व Swab testing कार्यवाही सुरू असून तदनंतर सदर कॅथलॅब कार्यान्वित करण्यात येणार आहे.

(३) व (४) पुणे, जालना, नांदेड व कोल्हापूर या जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये टर्न की (Turn Key) बेसीसवर कार्डियाक कॅथलॅब सुरु करण्यासाठी दिनांक २२ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार अंमलबजावणीसाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेता सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर (ता. जि.पालघर) एमआयडीसीतील मेडली फार्मास्युटिकल्स प्रा. लि व मे. आरती ड्रग्ज लिमिटेड या कंपनीमध्ये वायुगळती झाल्याबाबत

(३३) * १५८३४ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) एमआयडीसीतील प्लॉट क्रमांक १३ मध्ये असलेल्या मेडली फार्मास्युटिकल्स या औषध कंपनीत दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान वायुगळती होऊन झालेल्या दुर्घटनेत चार कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला तर दोन कामगार अस्वस्थ झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तारापूर एमआयडीसी परिसरातील प्लॉट क्र. १५० मधील आरती ड्रग्ज लिमिटेड या कंपनीमध्ये ॲसिड साठवणूकीच्या टाकीला भेगा पडल्याने आम्ल गळतीमुळे सालवड व शिवाजीनगर परिसरातील नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला असल्याबाबत दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान समर्थन संस्थेने मा. उद्योग मंत्री तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वीही वायुगळतीच्या घटना घडूनही औद्योगिक सुरक्षा व्यवस्था करण्यात कंपनी प्रशासन व स्थानिक यंत्रणा अपयशी ठरल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनी विरुध्द कारवाई करुन आपदग्रस्तांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे अंशत खरे आहे.

(२) समर्थन संस्थेने दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी मा. मंत्री, उद्योग तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांना याबाबत निवेदन दिलेले आहे.

(३) यापूर्वी मेडली फार्मास्युटिक्लस प्रा.लि. बोईसर, ता. व जि. पालघर येथे वायुगळतीची घटना घडलेली नाही.

तथापि, गतवर्षी मे.आरती ड्रग्स लि., जि.पालघर या कारखान्यात दिनांक १३ जुलै,२०२४ रोजी रसायनाची

वायू गळती झाली होती. सदर गळतीमुळे शेजारील कारखान्यातील ३ कामगारांना व कारखान्या शेजारी उभा

असलेल्या एका व्यक्तीस किरकोळ स्वरुपाची बाधा झालेली होती. त्यांना प्रथमोपचारानंतर घरी सोडून देण्यांत आले.

(४) दोन्ही वायुगळतीच्या घटनांमध्ये कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत भंगाकरीता भोगवटादार यांच्या विरुद्ध न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालघर यांच्याकडे खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

मे.मेडली फार्मसिटीकल्स लि., जि.पालघर या कारखान्याच्या घटनेमध्ये मृत पावलेले चार कामगारांपैकी श्री. कल्पेश राऊत यांच्या वारसास देय अपघात नुकसान भरपाई रु.१३,१६,५५०/- कामगार न्यायालय, ठाणे यांच्याकडे जमा करण्यांत आलेले आहे. उर्वरीत ३ मृत कामगार हे राज्य कामगार विमा योजना (ईएसआयसी) अंतर्गत नोंदणीकृत आहेत. सदर तीन्ही मृत कामगारांच्या वारसास पेंशन मिळण्याबाबतचा दावा कारखाना व्यवस्थापनाने ईएसआयसीकडे दाखल केलेला आहे.

तसेच कारखाना व्यवस्थापनाकडून सर्व मृत कामगारांच्या वारसांना एकूण रु.२२,५०,०००/- सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच कामगारांचा उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आलेला आहे.

मे.आरती ड्रग्स लिमिटेड, ता. जि. पालघर या कारखान्यातील दिनांक ०८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या घटनेत कारखान्यातील कामगारांना व परिसरातील नागरीकांना बाधा झालेली नाही.

सदर घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ या विभागाने सदर कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया बंदची नोटीस दिलेली आहे.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कारखाना व्यवस्थापनास सुरक्षिततेबाबत प्रतिबंधात्मक उपाय योजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील "मुख्यमंत्री लाडकी बहीण" या योजनेमध्ये पारदर्शकता आणण्याबाबत

(३४) * १५५९८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड),

श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "मुख्यमंत्री लाडकी बहीण" या योजनेंर्गत अपात्र असणाऱ्या लाभार्थ्यांनी आतापर्यंत १६४.५२ कोटी रुपयांचा लाभ घेतला असून त्यामध्ये १२ हजार ४३१ पुरूषांनी रु.२५ कोटी, तर ७७ हजार अपात्र महिलांनी रुपये १४० कोटी, तर ९५२६ शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी रु. १४.५० कोटी रुपये नियमबाह्य पद्धतीने या योजनेतून मिळविले आहेत, हे खरे आहे काय ,

(२) तसेच, प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना एक लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज देण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी केली असून त्यान्वये जिल्हा बँकामार्फत हे बिनव्याजी कर्ज मंजूर करण्यासाठी शासननिर्णय जारी करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतील पारदर्शकतेसाठी व पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करण्यासाठी ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया सर्व लाभार्थी महिलांसाठी अनिवार्य करण्यात आली असून बऱ्याच वेळा लाभार्थी महिलेचे वडिल मृत असणे, पती हयात नसणे किंवा घटस्फोट झाला असणे, नेटवर्कींच्या तांत्रिक समस्या अशा अनेक अडचणी येत असल्याने सदर प्रणाली अद्ययावत करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या योजनेमध्ये पारदर्शकता आणणे, अपात्र पुरुष, महिला तसेच सरकारी कर्मचाऱ्यांकडून वसूली करणेसह ई-केवायसी (e-KYC) मध्ये येणाऱ्या त्रुटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे अशंत: खरे आहे.

(२) याबाबतचा शासन निर्णय या विभागाकडून निर्गमित करण्यात आलेला नाही.

(३) व (४) "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्यास शासन परिपत्रक दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ दिनांकापासून २ महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले होते.

तथापि, राज्यातील काही जिल्हयात ओढवलेली नैसर्गिक आपत्ती, या योजनेच्या पात्र लाभार्थ्यांकडे त्यांच्या पती किंवा वडीलांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या आधार क्रमांकावर OTP प्राप्त होण्यास येत असलेल्या अडचणी तसेच याशिवाय या योजनेंतर्गत अनेक लाभार्थी महिलांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याचे निदर्शनास आले होते.

त्यानुषंगाने "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्याकरिता दिनांक ३१ डिसेंबर,

२०२५ पर्यंत शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील हयात नाहीत किंवा पती देखील हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे त्या लाभार्थी महिलांनी स्वत:चे e-KYC करावे व तद्नंतर त्यांनी त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा.न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविका यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत जमा करण्याबाबत निर्देश दिले आहे.

या योजनेच्या अपात्रतेच्या अटीनुसार सदर अधिकारी/कर्मचारी पात्र नसताना सुध्दा या योजनेचा जाणीवपूर्वक सदर योजनेचा लाभ घेतल्याने संबंधित शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमातंर्गत आवश्यक ती कार्यवाही करुन त्यांचेकडून वसुली करण्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.